# मनाची तेजस्विता

१ एप्रिल, २०१९

आत्मीय वाचकांनो,

एप्रिल महिन्याच्या आगमनासह, उत्तर गोलार्ध वसंतऋतूच्या रंगात न्हाऊन निघतो. या वर्षी श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या अभ्यासात स्वतःला निमग्न केल्यामुळे आपली साधना समृद्ध झाली आहे आणि नवीनतम ऊर्जेने परिपूर्ण झाली आहे.

‘मधुर सरप्राइझ्‌ २०१९’मध्ये, श्रीगुरुमाईंनी सकारात्मक मनापासून होणाऱ्या लाभांचा उल्लेख केला आहे. या महिन्यात, त्या नवीन मार्गांचा शोध घेण्यासाठी मी तुम्हाला आमंत्रित करते आहे, ज्यांमुळे तुमच्या मनाला त्याच्या स्वतःच्या दीप्तिमान स्वभावाची ओळख व्हावी, त्याचा अंगीकार करता यावा आणि त्याला स्पर्श करता यावा. तुम्ही जेव्हा प्रत्येक क्षणाला या जागरूकतेसह सामोरे जाल, तेव्हा तुम्हाला सकारात्मक मनाच्या कृपेची ओळख पटेल. तो एक असा क्षण असू शकतो जेव्हा तुमच्या अंतरात एक अवर्णनीय आनंद उदित होऊ शकतो किंवा तुमच्या हृदयात शुद्ध प्रेम उसळी घेत असल्याचे तुम्ही अनुभवता किंवा तुम्हाला कदाचित अशी अनुभूती होऊ शकते की, शांतीच्या आणि सर्वांप्रतिच्या सहृदयतेच्या चादरीने तुम्हाला आच्छादिले आहे.

सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर या महिन्यात प्रसारित होणारी रत्ने प्रज्ञान आणि ज्ञानाने चमकत आहेत, जेणेकरून मनाच्या तेजोमय स्वरूपाला अनावृत करायला तुम्हाला मदत व्हावी. या संपूर्ण महिनाभरात तुम्ही जेव्हा वेबसाइट पाहाल, तेव्हा तुम्हाला त्यात खालील गोष्टी आढळतील :

- या महिन्यासाठी असलेले ध्यान-सत्र, ज्याचे शीर्षक आहे ‘*Shepherd the Mind toward Its Own Light*’, जे प्रथम थेट ऑडिओ प्रसारणाद्वारे आणि कालांतराने वेबकास्टद्वारे उपलब्ध होईल.

- ‘साधना और परिशुद्ध बुद्धी’ — स्वामी अखंडानंद यांच्याद्वारे लिखित भाष्य, जे मनाला आत्म्याच्या प्रकाशासमवेत अधिक चांगल्या रितीने एकलय होण्याच्या मार्गांविषयी माहिती देते.
- ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित ‘२०१९च्या गुरुमाईंच्या संदेशावर आधारित नवीन कथा’
- भारतातील संतकवींनी रचलेल्या भजनांचे, अभंगांचे आणि दोह्यांचे एक संकलन, जे पवित्र मंत्र, सोऽहम्‌चे महत्त्व प्रतिपादित करते.
- ‘श्रीगुरुमाई के संदेश पर अभ्यास-पुस्तिका’ यामधील ‘अभ्यास-पत्र १० से १३’. या अभ्यास-पत्रांतील श्रीगुरुमाईंनी दिलेल्या प्रश्नांचा शोध घेणे, हे एक सशक्त माध्यम आहे ज्यामुळे स्वतःच्या मनाच्या कार्य करण्याच्या पद्धतींना समजून घेण्याचे आणि अशा पद्धती शिकण्याचे की ज्या मनाला त्याच्या वैभवाकडे पुन्हा मार्गदर्शित करतात.

सिद्धयोग मार्गावर साजरे होणारे महोत्सव, आपल्या जीवनात सत्य विद्यमान आहे या गोष्टीची शक्तिशाली स्मरणपत्रे बनतात. एप्रिल हा महिना, आपल्याला साजरे करण्यासाठी अनेक प्रसंगदेखील प्रदान करतो. दोन अशी पर्वे आहेत ज्यांच्याविषयी तुमच्याशी बोलण्याची माझी इच्छा आहे.

भारतात, ६ एप्रिलला चैत्र महिन्याचा आरंभ होतो आहे, जो हिंदू पंचांगातील पहिला महिना आहे. महाराष्ट्रात हा नववर्ष दिवस ‘गुढीपाडवा’ या नावाने साजरा केला जातो. सर्वत्र उत्सवाचे वातावरण असते. रस्त्यांवर शोभायात्रा काढल्या जातात, शाही मेजवान्यांचे आयोजन केले जाते आणि उठावदार व रंगीबेरंगी रांगोळ्यांनी घरे सजवली जातात. हा एक आगळा नववर्ष दिवस आहे, स्वतःच्या साधनेप्रति असलेल्या आपल्या वचनबद्धतेचे नवीनीकरण करण्यासाठी असलेला एक मंगलदायी प्रसंग.

याबरोबरच, २२ एप्रिलला, ‘अर्थ डे’ [Earth Day] आहे. हा दिवस आपल्या महानतम पृथ्वी ग्रहाच्या प्रचुरतेचा सन्मान करण्यासाठी आणि तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समर्पित आहे.

मी जेव्हा उंच, घनदाट छाया देणाऱ्या वृक्षांना किंवा भव्य पर्वतरांगांना किंवा वाहणाऱ्या नद्यांना निरखून पाहते, जेव्हा मला या नितांत सुंदर सौंदर्याचे आकलन होते, तेव्हा एक आल्हाददायक प्रशांती माझ्या मनाला व्यापते. मी माझ्या मनाच्या तेजस्वीतेप्रति जागरूक होते. हा क्षण माझ्यासाठी कसा आहे हे व्यक्त करण्याची एक पद्धत म्हणून मी हे पद्य लिहिले आहे आणि त्या ओळी तुम्हाला सांगाव्यात अशी माझी इच्छा आहे.

निसर्गाच्या प्रत्येक देखाव्यातील तुझ्या वैभवावर मी जेव्हा नजर टाकते,
तेव्हा मला माझे जीवन तुझ्या वरदानांनी बहरलेले दिसते.

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.